सकाळ

# वर्षा ऋतूतील रागावर कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील लोकविकास केंद्र आणि संगीत व नाट्यशास्त्र विभाग यांनी अभिनव कार्यशाळेचे आयोजन केले आहे. 'वर्षा ऋतूतील राग व त्यावर आधारित शास्त्रीय व उपशास्त्रीय संगीत' हा कार्यशाळेचा विषय आहे. २४ ते २६ जुलै या कालावधीत ही कार्यशाळा होईल. संगीत व नाट्यशास्त्र विभागात दुपारी दोन ते साडेपाच या वेळेत लोकसेवा केंद्र येथे ही कार्यशाळा होणार आहे. यामध्ये प्रामुख्याने पावसाळ्यातील राग व त्यातील प्रभावी स्वर रचना आणि स्वर संगती यावर माहिती दिली जाईल.

# पारितोषिकाने यश प्राप्तीला अधिक बळ

## – डॉ. देवानंद शिंदे

कोल्हापूर / प्रतिनिधी :

पदवी, पारितोषिक मिळते त्यावेळेस फार मोठ्या संधीचे अवकाश प्राप्त झालेले असते. यश प्राप्त करण्यासाठी हीच पारितोषिके बळ देणारी ठरतात, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभप्रसंगाची पारितोषिके व स्मृतिचिन्हे प्रदान कार्यक्रमाचे आयोजन मानव्यशास्त्र इमारतीमध्ये करण्यात आले होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षांत समारंभप्रसंगाची पारितोषिके व स्मृतिचिन्हे प्रदान कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.**

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, जीवनाच्या प्रवासामध्ये अनेक समस्या पुढे येत असतात. यावर मात करण्याची दृष्टी विकसित करता आली पाहिजे. समस्यांपेक्षा उपायांवर चर्चा केलेली अधिक चांगले, त्यामुळे आणखी एक संधी निर्माण होते. समाजापुढे जबाबदार नागरिक म्हणून गेल्यास शिवाजी विद्यापीठाच्या नावलौकिकामध्ये भर पडणार आहे. स्वतःमधील क्षमता विकसित करताना तुलनेच्या चक्रात पडण्यापेक्षा आत्मविश्वास आणि विविध कौशल्यांचे बळ प्राप्त केल्यास निश्चित यश प्राप्त होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते ९१ पारितोषिके विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



कोल्हापूर : पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांबरोबर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

# पारितोषिकातून मिळते यशाचे बळ

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; दीक्षांत समारंभाची पारितोषिके, स्मृतिचिन्हे प्रदान

कोल्हापूर, ता. २१ : 'पदवी, पारितोषिक मिळते त्यावेळेस आपल्याला फार मोठ्या संधीचे अवकाश प्राप्त झालेले असते. यश प्राप्त करण्यासाठी हेच पारितोषिक बळ देणारे ठरते,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षांत समारंभ प्रसंगाची पारितोषिके व स्मृतिचिन्हे प्रदान कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीत झालेल्या या कार्यक्रमात पारितोषिके वितरणानंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शनप्रसंगी कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते. या वेळी अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, "जीवनाच्या प्रवासात अनेक समस्या पुढे येत असतात. यावर मात करण्याची दृष्टी आपणास विकसित करता आली पाहिजे. समस्यांपेक्षा उपायांवर चर्चा केलेली अधिक चांगली. त्यामुळे एक संधी निर्माण होते. समाजापुढे जबाबदार नागरिक म्हणून गेल्यास शिवाजी विद्यापीठाच्या नावलौकिकात भर पडणार आहे. स्वत:मधील क्षमता विकसित करताना तुलनेच्या चक्रात पडण्यापेक्षा आत्मविश्वास आणि विविध कौशल्यांचे बळ प्राप्त केल्यास यश निश्चित प्राप्त होते." या वेळी मान्यवरांच्या हस्ते ९१ पारितोषिके विद्यार्थ्यांना प्रदान केली. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर यांनी आभार मानले.

लोकमत

# विद्यापीठात बुधवारपासून शास्त्रीय संगीत कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील लोकविकास केंद्र आणि संगीत व नाट्यशास्त्र विभाग यांच्यातर्फे 'वर्षाऋतूतील राग व त्यावर आधारित शास्त्रीय व उपशास्त्रीय संगीत' या विषयावर २४ ते २६ जुलै या कालावधीत तीन दिवसांच्या कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

ही कार्यशाळा लोकविकास केंद्र येथे दुपारी दोन ते ५.३० या वेळेत आयोजित करण्यात आलेली आहे. यामध्ये प्रामुख्याने पावसाळ्यातील राग व त्यातील प्रभावी स्वररचना आणि स्वरसंगती यासंबंधी माहिती दिली जाईल. त्याचबरोबर पावसाळ्यासंबंधी रचलेल्या विविध गाण्यांमध्ये त्यांचा कसा उपयोग करुन घेतलेला आहे, यावरही विवरण होईल. या प्रकारची गाणी सादर करण्यासाठीची कौशल्येही शिकविली जातील. या कार्यशाळेस ज्येष्ठ संगीततज्ज्ञ व संगीत नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर मार्गदर्शन करणार आहेत. इच्छुकांनी लोकविकास केंद्राकडे सकाळी ११ ते ५ या वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. मंजूषा देशपांडे यांनी केले आहे.

Hello Kolhapur
Page No. 5 Jul 22, 2019
Powered by: erelego.com

# ग्रंथालयशास्त्राबाबत आज कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या



बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग व सुक्ला (शिवाजी युनिव्हर्सिटी कॉलेज लायब्ररीयन्स असोसिएशन) यांच्या संयुक्त विद्यमाने २२ जुलै रोजी एक दिवसीय संवेदीकरण कार्यक्रम आयोजित केला आहे. या परिषदेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू, डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.